Annexure XVI(7),(Vide Article-16.03.03)

(सोबत सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीएफआर-१२०२/४४०/१३, दिनांक ०१.८.२००२ [illegible] जोडण्यात आली आहे.)

क्रमांक : स-११/०३/०८/८६०८/म-५

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दि. २ ऑक्टोबर, २००४.

सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी ई, ई-१, ई-६, ई-७, ई-८, ई-९, ई-१०, फ-४, फ-५, फ-७, फ-८, म-१, ल-७ कार्यासने महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

2. उर्वरित सर्व अवर/कक्ष सचिव.

(म. मां. पाटील)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या गोपनीय अहवालासंदर्भात लोकप्रतिनिधीमार्फत राजकीय दबाव आणल्यास अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात त्याबाबतची नोंद घेण्याबाबत.

महसूल व वन विभाग
रद्दी क्रमांक [illegible]

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक-सीएफआर-१२०२/४४०/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ ऑगस्ट, २००३.

वाचा : सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. सीएफआर-१२९५/प्रक्र-३६/९५/तेरा, दिनांक १-२-१९९६.

परिपत्रक

असे निदर्शनास आले आहे की, काही शासकीय अधिकारी/कर्मचारी त्यांच्या गोपनीय अहवालामधील प्रतिकूल शेरे वगळण्यासंदर्भात लोकप्रतिनिधीमार्फत राजकीय दबाव आणतात महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक), नियम १९७९ मधील नियम क्रमांक २३ अन्वये शासकीय कर्मचा-यांने त्यांच्या संवाविषयक बाबींसंदर्भात राजकीय दबाव आणण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने अशा सूचना देण्यात येत आहेत की, जे शासकीय अधिकारी/कर्मचारी गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे काढून टाकण्यासंदर्भात बाहेरील व्यक्तींकडून किंवा लोकप्रतिनिधींमार्फत राजकीय दबाव आणतील किंवा शिफारसपत्र आणतील अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात त्याबाबतची नोंद घ्यावी. ही नोंद सांयत जोडलेल्या नमुन्यामध्ये गोपनीय अहवालाचे संस्करण करणा-या संबंधित आस्थापना अधिका-याने घ्यावी. अशी नोंद घेतल्यानंतरच सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने गोपनीय अहवालाच्या प्रतवारीचा विचार करण्यात यावा.

उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
प्र. कृ. लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीएफआर-१२०३/४४०/१३,
दिनांक १ ऑगस्ट, २००३ चे जोडपत्र

१)	विभागाचे नाव	:
२)	शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे संपूर्ण नाव	:
३)	धारण केलेले पद	:
४)	सदर अधिकारी/कर्मचारी यांनी गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे काढून टाकण्यासंदर्भात बाहेरील व्यक्ती/लोकप्रतिनिधीमार्फत राजकीय शिफारसपत्र आणले असल्यास त्याचा तपशील (अनेक वेळा आणल्यास त्यांच्या तारखा नमुद करण्यात याव्यात	: